REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 9 | JUNE - 2025

# ''विधवा महिलाः सामाजिक आर्थिक स्थिती व शासकीय योजनेचा लाभ'' (विशेष संदर्भ, पुसद तालुका जि. यवतमाळ)

डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख
सहयोगी प्राध्यापक,
गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविदयालय पुसद जि. यवतमाळ.

## प्रस्तावना



भारतात महिलांची संख्या पुरूषांच्या बरोबरीची आहे. अलिकडच्या जनगणनेमध्ये महिलांचे प्रमाण कमी होताना दिसुन येत असले तरी अदयापही त्यामध्ये फार मोठया प्रमाणात घट दिसून येत नाही. भारतात महिलांची स्थिती काळनिहाय बदलत गेली. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांना समान अधिकार प्राप्त झालेत. त्यातुन त्यांचा ब—यापैकी विकास होत असल्याचे दिसून येते. असे असले तरी विधवा महिलांची स्थिती अदयापही फारशी समाधानकारक दिसत नाही. ज्या पध्दतीने सामान्य महिलांच्या स्थितीमध्ये बदल होत गेला त्याप्रमाणेच काही प्रमाणात विधवा महिलांच्या स्थितीमध्ये बदल झाल्याचे दिसून येते. मात्र त्यामध्ये फार मोठा बदल झाला असे म्हणता येणार नाही. नाही म्हणायला विधवांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी शासनाने अनेक योजना सुरू केलेल्या आहेत मात्र त्यांचा प्रसार व प्रचार किंवा योजनांचा लाभ घेताना येत असलेल्या अडचणी पाहता विधवा महिला, योजनांच्या लाभापासुन वंचितच राहतात. ही स्थिती लक्षात घेता पुसद तालुक्यातील विधवा महिलांची स्थिती व त्यांना मिळत असलेल्या शासकीय योजनेच्या लाभाची स्थिती जानुन घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातुन करण्यात आला आहे. यासाठी प्राथमिक तथ्याचा उपयोग करण्यात आला आहे.

## ▪ उददेश—

प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उददेश विधवा महिलांची स्थिती जानुन घेउन त्यांना मिळत असलेल्या शासकीय योजनांची स्थिती अभ्यासणे हा मुख्य उददेश असून यासाठी प्राथमिक तथ्याचा उपयोग करण्यात आला आहे.

## ▪ पध्दतीशास्त्र—

प्रस्तुत शोध निबंध प्राथमिक तथ्यावर आधारीत असून त्याकरीता पुसद तालुक्यातील 40 विधवा महिलांची निवड करण्यात आली होती. कोटा पध्दतीनुसार 40 संख्या निर्धारित केल्यानंतर पुसद तालुक्यातील ग्रामीण भागांमधुन विधवा महिलांची निवड करताना सहेतुक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात आला.

## ▪ प्राथमिक तथ्यावर आधारीत विधवा महिलांची स्थिती

### 1. विधवांची वैयक्तीक माहिती–

अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण 40 विधवा महिलांचे वयोगट अभ्यासले असता असे दिसून आले की, 19 ते 25 वर्ष वयोगटातील फार कमी म्हणजेच 05 टक्के महिला होत्या. अधिकांश महिला 35 ते 45 वर्ष वयोगटातील आढळून आल्यात त्यांचे शेकडा प्रमाण 70 होते. उर्वरित 25 टक्के महिला अन्य वयोगटातील होत्या. विधवा महिलांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण शुन्य टक्के आढळून आले. अध्ययनामध्ये समाविष्ट एकही महिला पदवी पर्यंत शिक्षण घेतलेली नव्हती. जवळपास 20 टक्के महिला निरक्षर आढळुन आल्यात.

जातीय वर्गवारी असे दर्शविते की, अधिकांश महिला (70.00 टक्के) व्हीजे जातीय वर्गवारीतील होत्या. असे असन्याचे प्रमुख कारण म्हणजे पुसद तालुका बंजारा बहुल भाग आहे. त्यापाठोपाठ 20 टक्के महिला अनुसुचीत जमातीच्या होत्या. उर्वरित महिला अन्य जातीय वर्गवारीतील होत्या. पतीच्या मृत्युचे कारण अभ्यासले असता सर्वाधिक (70 टक्के) महिलांचे पती आजारपणापनामुळे मृत पावलेत तर 10 टक्के महिलांचे पती शेतीमध्ये काम करताना सर्पदंशामुळे तसेच 05 टक्के महिलांचे पती अपघातामध्ये मृत्युमुखी पडले. उर्वरित (15 टक्के) मृत्युमध्ये आत्महत्या, मर्डर, तथा अन्य कारणाने झाला होता. विधवा महिलांच्या उदरनिर्वाहाचे साधन अभ्यासले असता 70 टक्के विधवा महिला आपला उदरनिर्वाहासाठी मजुरी करतात तर 15 टक्के महिला कुटुंबियांवर निर्भर आहेत. उर्वरित 15 टक्के महिला शेती, व्यवसाय, नोकरी इत्यदींवर निर्भर होत्या.

### 2. विधवा महिलांची समाजिक स्थिती–

काळ बदला, शिक्षणाचे प्रमाण वाढले अशा स्थितीत विधवा महिलांच्या सामाजिक स्थितीत कोणते परिवर्तन आले हे अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला. बहुतांश विधवा महिलांच्या मते अदयापही विधवा महिलांना सामाजिक उपक्रमात सहभागी करून घेतल्या जात नाही. विशेष करून कुटुंबामध्ये कोणतेही पवित्र कार्य असेल तर त्यापासुन विधवा महिलांना दुर ठेवल्या जाते. जसे विवाह, पुजा अर्चना, हळदी कुंकु अशा प्रसंगी विधवा महिलांना दुर ठेवल्या जाते. मकरसंक्रातीमध्ये विधवा महिलांना निमंत्रित केल्या जात नसल्याचे सर्वच महिलांनी मत नोंदविले. विधवा महिलांच्या बाबतीत अदयापही अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा असल्याचे दिसून आले. यामध्ये कोणत्याही शुभप्रसंगी विधवा महिलांचा चेहरा दिसू नये. शुभकार्यासाठी घराबाहेर पडत असताना विधवा महिला आडवे आल्यास ते काम होत नाही. अशा अनेक अंधश्रध्दा समाजात दिसून येतात.

विधवा महिलांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोण सुध्दा नकारात्मक असल्याचे मत अधिकांश महिलांनी नोंदविले. पतीच्या मृत्युसाठी महिलांना अपशकुनी समजल्या जाते. तथा अनेक महिलांना अनैतिक छळाचा सामना सुध्दा करावा लागला.

### 3. विधवा महिलांची आर्थिक स्थिती

अध्ययनात समाविष्ट अधिकांश विधवा महिलांची आर्थिक स्थिती खालावलेली आढळुन आली. पतिच्या मृत्युनंतर कुटुंबातुन वेगळे काढल्या गेले अशा स्थितीत कुटुंबातील संपत्तीत वाटा दिल्या गेला नाही. अधिकांश महिलांना अर्थार्जनासाठी मजुरी करावी लागते. मजुरी दर सुध्दा अत्यल्प असल्यामुळे आर्थिक समस्या निर्मान झाल्या आहेत. ज्यामध्ये मुलांना शिक्षण सोडावे लागले. गावात पुरेसा रोजगार मिळत नसल्यामुळे रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. यामध्ये उसतोडणीसाठी पाच ते सहा महिने घरापासुन दुर रहावे लागते. आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे आरोग्याच्या समस्या सुध्दा महिलांना निर्मान झालेल्या आहेत.

### 4. शासकीय योजनांच्या लाभाची स्थिती

विधवा महिलांचे जीवन सुसहय व्हावे या अनुषंगाने केंद्र तथा राज्य शासनाने विधवा महिलांसाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. या अनुषंगाने विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे का हे अभ्यासन्यात आले.

**सारणी 1**
**विधवा महिलांना मिळालेला शासकीय योजनांचा लाभ**

| अक | शासकीय योजना | लाभाची स्थिती | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | लाभ मिळाला | लाभ मिळाला नाही | |
| 1 | इंदिरा गांधी राष्ट्रीय पेंशन योजना | 15 (37.50 टक्के) | 25 (62.50 टक्के) | 40(100टक्के) |
| 2 | संजय गांधी निराधार योजना | 00(00 टक्के) | 40(100 टक्के) | 40(100टक्के) |
| 3 | घरकुल योजना | 03(7.50 टक्के) | 27(92.50 टक्के) | 40(100टक्के) |
| 4 | उज्वला गॅस योजना | 16(40.00 टक्के) | 24(60.00 टक्के) | 40(100टक्के) |
| 5 | राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना | 08(20.00 टक्के) | 32(80.00 टक्के) | 40(100टक्के) |
| 6 | अन्य आर्थिक सहाय योजना | 17(42.50 टक्के) | 23(58.00 टक्के) | 40(100टक्के) |
| 7 | लाडकी बहीन योजना | 07(17.50 टक्के) | 33(82.50 टक्के) | 40(100टक्के) |
| 8 | राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना | 09(22.50 टक्के) | 31(83.50 टक्के) | 40(100टक्के) |
| 9 | शौचालय योजना | 11(27.50 टक्के) | 29(72.50 टक्के) | 40(100टक्के) |

उपरोक्त सारणीत स्पष्ट दिसून येते की, अधिकांश विधवा महिला शासकीय योजनांच्या लाभापासुन वंचित आहेत. भारतात केंद्र तथा राज्य स्तरावर विधवा महिलांसाठी अनेक योजना आहेत. तथा अनेक अशा योजना आहेत की, ज्यामध्ये विधवा महिलांना प्राधान्य देने बंधनकारक आहे असे असतानाही विधवा महिलांना डावलल्या जात असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ घरकुल योजनेचा लाभ देत असताना विधवा महिलांना प्राधान्य देने अपेक्षित असताना केवळ 7.50 टक्के महिलांना घरकुल योजनेचा लाभ मिळाला आहे. हर घर शौचालय योजनेच्या माधमातुन प्रत्येकाला शौचालय मिळणे अपेक्षीत असताना केवळ 27.50 टक्के महिलांना शौचालय योजनेचा मिळाला आहे. हीच स्थिती प्रत्येक शासकीय योजनेच्या बाबतीत दिसून येते.

## ■ निष्कर्ष

भारतात विधवा महिलांची स्थिती प्रत्येक कालखंडात दयनिय राहीली आहे. सतीप्रथा, केशवपन, अलकांरीत वस्तुंच्या वापरावर बंदी, श्वेत वस्त्र परिधान करणे, पुणर्विवाहास बंदी, समाजिक–धार्मिक कार्यक्रमातुन बहिष्कृत करणे, इच्छा व भोगापासुन मुक्त ठेवने, अशा अनेक कुप्रथा प्राचान काळी असल्याचे दिसून येते. या कुप्रथांवर वेळोवळी बंदी आनुन विधवांना सन्मानाने जगन्याचा मार्ग निर्माण करण्याचा प्रयत्न केल्या गेला. त्याला काही प्रमाणात यश सुध्दा प्राप्त झाले मात्र अदयापही विधवांचा सामाजिक आर्थिक दर्जा सुधारल्याचे दिसून येत नाही. शासनाने अनेक योजना सुरू करून विधवांना आधार देण्याचा प्रयत्न केला असला तरी शिक्षणाचा अभाव, योजनेतील भ्रष्टाचार अशा बाबींमुळे विधवा महिला शासकीय योजनांपासुन वंचित असल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ

1. Agarwal, B., Anthwal, P., and Mahesh, M. (2021). "How Many and Which Women Own Land in India? Inter-gender and Intra-gender Gaps". *Journal of Development Studies* 57 (11): 1807–1829. https://doi.org/10.1080/00220388.2021.1887478
2. Barnali Sharma, U. R. (2017, July ). A Comparative Analysis of Widows and Widowers in India. International Journal of Recent Scientific Research, 8(7), 69-73. DOI:10.24327/IJRSR
3. Bhai, L. T. (2004). Widows in India. BR Publishing Corporation.
4. Chakravarti, U. (1998). "Gender, Caste, and Labour: The Ideological and Material Structure of Widowhood". *Widows in India: Social Neglect and Public Action* 30 (36): 1–63.

5. Firdaush, S. and Das, P. (2023). "Intimate Partner Violence and Its Associated Factors: A Multidimensional Analysis in the Context of India" *Journal of Asian and African Studie*s (ahead of print) https://doi.org/10.1177/00219096231176748
6. International Institute for Population Sciences & United Nations Population Fund (2023). "India Ageing Report 2023, Caring for Our Elders: Institutional Responses", United Nations Population Fund, New Delhi.
7. International Journal of Multidisciplinary and Current Research, 2, 45-58.
8. Mathur, S. (2023). "Dalit Women in India: Patterns and Forms of Atrocities". In *Gender Inclusion in India*, edited by Sabiha Hussain and Suraiya Tabassum: 117–137. Routledge.
9. Sahoo, D. M. (2014, January). An Analysis of Widowhood in India: A Global Perspective.